स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भ : रासेयो/२०२६–२७/४३** **अतिमहत्त्वाचे व तातडीचे** **दि. १९/०५/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**फक्त पुणे व पिंपरी चिंचवड शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याबाबत**

महोदय,

पुणे शहरात खूप मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरांचे आयोजन होत असले, तरी देखील शासकीय रक्तपेढीमधे कधी–कधी रक्ताचा तुटवडा जाणवतो. कारण शहरात शासकीय रक्तपेढी समवेत रक्तदान शिबिरांचे आयोजन कमी प्रमाणात केले जाते. कारण शासकीय रक्तपेढी कोणतेही आमिष न दाखवता निस्वार्थ व स्वेच्छेने रक्तदान शिबिरांचे आयोजन सर्व नियमांचे काटेकोर पालन करून करत असते.

साधारणतः मे व जून महिन्यांमध्ये ससून शासकीय रुग्णालय येथे रक्ताचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा निर्माण होत असतो. या कालावधीत गोरगरीब व गरजू रुग्णांच्या अनेक नियोजित शस्त्रक्रिया (Planned Surgeries) होत असतात. सद्यस्थितीत पुणे शहर व पुणे ग्रामीण परिसरातील महाविद्यालयांनी तातडीने रक्तदान शिबिरे आयोजित केल्यास, ससूनसारख्या शासकीय रुग्णालयांची रक्ताची गरज काही प्रमाणात भागविण्यास मोठी मदत होऊ शकते.

तरी पुणे शहर व पुणे ग्रामीणमधील ज्या महाविद्यालयांना तातडीने रक्तदान शिबिर आयोजित करणे शक्य आहे, त्यांनी कृपया त्वरित प्रतिसाद द्यावा. (एका रक्तदान शिबिरामधून किमान ३० ते ४० रक्तपिशव्या संकलित झाल्यास, गोरगरीब व गरजू रुग्णांना राष्ट्रीय सेवा योजना मार्फत अत्यंत मोलाचे सहकार्य मिळू शकेल.)

आयोजक महाविद्यालयाने रक्तदान शिबिराची माहिती/तपशील पुढील गुगल लिंकद्वारे भरावी.

https://forms.gle/wRstJoqVTumziAed7

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**